क्र. १५२ पहिले वर्ष

०९ जुलै २०२३

# रविवारची उपासना

## सामान्यकाळातील चौदावा रविवार

### प्रस्तावना

अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हाला विसावा देईन. परमेश्वर दयाळू व कनवाळू आहे. तो पित्याप्रमाणे आपणांवर दयेने पाहात असतो. आपल्या संकटसमयी आपणांस धीर, दिलासा देत असतो. आजच्या शुभवर्तमानात ख्रिस्त आपणांस त्याच्याकडे बोलावित आहे. आपले दु:ख, कष्ट, अडीअडचणी प्रभूला अर्पू या आणि परमेश्वराच्या कृपेची याचना करू या. तसेच परमेश्वराच्या प्रेमाचा स्पर्श नेहमी आपणांस व्हावा व त्याच्या कृपेत, शांतीत व प्रेमात वाढावेत म्हणून ह्या पवित्र मिस्साबलीत प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे सर्वसमर्थ बापा, तुझा सेवक व तुझा पुत्र प्रभू येशू ख्रिस्त, ह्याच्या आज्ञापालनाद्वारे पतित जगाचा तू उध्दार केलास. आम्हांला पापमुक्त कर व सर्वकाळच्या आनंदात सहभागी कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

### पहिले वाचन

**प्रभूशब्द विधी**

**जखऱ्या या पुस्तकातून घेतलेले वाचन ९:९-१०**

**''पाहा, तुझा राजा तुझ्याकडे येत आहे.''**

परमेश्वर असे म्हणतो :''सियोनकन्ये, जोराने आनंदाचा गजर कर; यरुशलेमकन्ये, गरज कर; पाहा, तुझा राजा तुझ्याकडे येत आहे; तो न्यायी आणि यशस्वी आहे; तो लीन आहे; गाढवावर, गाढवीच्या पिलावर म्हणजे शिंगरावर बसून येत आहे. इफ्राईमातले रथ, यरुशलेमातले घोडे मी नष्ट करीन; युध्दधनुष्य तोडून टाकण्यात येईल, तो राष्ट्रांबरोबर शांतीच्या गोष्टी बोलेल; त्याचे अधिपत्य प्रत्येक समुद्रावर आणि फरातनदीपासून तो पृथ्वीच्या दिगंतापर्यंत चालेल.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**१४५:१-२, ८-९, १०-११, १३कड-१४**

प्रतिसाद : **मी सदासर्वकाळ तुझ्या नावाचा धन्यवाद देईन.**

१. हे राजा, माझ्या देवा, मी तुझी थोरवी गाईन आणि सदासर्वकाळ तुझ्या नावाला धन्यवाद देईन. मी प्रतिदिवशी तुला धन्यवाद देईन आणि सदासर्वकाळ तुझ्या नावाचे स्तवन करीन.

२. परमेश्वर कृपाळू आणि दयाळू आहे, तो मंदक्रोध आणि अतिदयाळू आहे. परमेश्वर सगळ्यांना चांगला आहे, त्याची कृपा त्याने निर्मिलेल्या सर्व कृत्यांवर आहे.

३. हे परमेश्वरा, तुझी सर्व कृत्ये तुझी स्तुती गातात, तुझे भक्त तुला धन्यवाद देतात. ते तुझ्या राज्याचा महिमा वर्णितात आणि तुझा पराक्रम कथन करतात.

४. प्रभू आपल्या वचनाला जागतो, त्याची प्रत्येक कृती प्रेमाची असते. पतन पावणाऱ्या सर्वांना परमेश्वर आधार देतो आणि वाकलेल्या सर्वांना उभे करतो.

### दुसरे वाचन

**पौलाचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन ८:९, ११-१३**

**''जर तुम्ही आत्म्याने शरीराची कर्मे ठार मारलीत तर जगाल.''**

तुम्हामध्ये जर देवाचा आत्मा वसती करीत आहे, तर तुम्ही देवाच्या अधीन नाही, आत्म्याच्या अधीन आहा. जर कोणाला ख्रिस्ताचा आत्मा प्राप्त झालेला नसेल तर तो ख्रिस्ताचा नाही. ज्याने मेलेल्यातून उठवले, त्याचा आत्मा जर तुम्हांमध्ये वसती करतो, तर ज्याने ख्रिस्त येशूला मेलेल्यातून उठवले तो तुम्हांमध्ये वस्ती करणाऱ्या आपल्या आत्म्याने तुमची मर्त्य शरीरेही जिवंत करील.

तर मग बंधुजनहो, आपण ऋणी आहो खरे, तरी देहस्वभावाप्रमाणे जगावयाला देहस्वभावाचे ऋणी नाही. कारण जर तुम्ही देहस्वभावाप्रमाणे जगलात तर तुम्ही मरणार आहा, परंतु जर तुम्ही आत्म्याने शरीराची कर्मे ठार मारलीत तर जगाल.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**मत्तय ११:२५**

**आलेलुया, आलेलुया!**

हे पित्या, स्वर्गाच्या आणि पृथ्वीच्या प्रभो, मी तुझे स्तवन करतो; कारण ह्या गोष्टी तू बाळकांस प्रकट केल्या.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन ११:२५-३०**

**''मी मनाचा सौम्य आणि लीन आहे.''**

त्यावेळी येशू बोलू लागला : ''हे पित्या, स्वर्गाच्या आणि पृथ्वीच्या प्रभो, मी तुझे स्तवन करतो; कारण ज्ञानी व विचारवंत ह्यांच्यापासून ह्या गोष्टी गुप्त ठेवून त्या तू बाळकांस प्रकट केल्या. खरेच, हे पित्या, हेच तुला योग्य दिसते. माझ्या पित्याने माझ्या हाती सर्वकाही दिले आहे आणि पित्यावाचून पुत्राला कोणी ओळखत नाही आणि पुत्रावाचून व ज्या कोणाला त्याला प्रगट करावयाची त्याची इच्छा असेल, त्याच्यावाचून पित्याला कोणी ओळखत नाही. अहो कष्टी आणि भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन. मी जो मनाचा सौम्य आणि लीन आहे त्या माझे जू आपणावर घ्या आणि माझ्यापासून शिका म्हणजे तुमच्या जिवास

विसावा मिळेल. कारण माझे जू सोयीचे आणि माझे ओझे हलके आहे.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्‍वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद : **हे प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. ख्रिस्ती श्रध्दा आमच्या मनात बिंबविणारे परमगुरुस्वामी, महागुरू, धर्मगुरू व धर्मभगिनी ह्यांना प्रभूने चांगले मानसिक व शारीरिक आरोग्य द्यावे म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

२. ख्रिस्ती श्रध्दा जोपासत असताना आपल्या मार्गात येणाऱ्या इतर पंथीयांच्या भूलथापांना बळी न पडता ख्रिस्ताशी एकनिष्ठ राहण्याची सुबुध्दी लाभावी म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

३. मुलांना ख्रिस्ती मूल्ये शिकविणाऱ्या संडे स्कूल धर्मशिक्षकांनी आपण भावी ख्रिस्तसभा घडवत आहोत ही गोष्ट लक्षात ठेऊन मुलांना योग्य ते धर्मशिक्षण देऊन त्यांना ख्रिस्ती श्रध्देत वाढवावे, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

४. आपण जे आज इथे हजर आहोत, आपल्या धर्माचरणावरून आपल्या ख्रिस्ती श्रध्देची साक्ष आपणाला इतरांना देता यावी म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

५. वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करूया.

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रध्देमधील उणीवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तुझ्या नावाच्या गौरवार्थ आम्ही हे दान तुला अर्पण करीत आहोत. ह्या दानामुळे आम्हाला पवित्र कर व सार्वकालिक जीवनात सहभागी होण्यास पात्र कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, या ख्रिस्तप्रसादाद्वारे तू आम्हाला परिपूर्ण जीवन व मुक्तीचे दान देतोस. ह्या तुझ्या उपकारांचे विस्मरण आम्हाला कधीही होऊ देऊ नकोस. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

परस्पर गोष्टी एकत्र आणून त्याद्वारे प्रभूच्या संदेशाचे महत्त्व अधोरेखित करणे ही बायबल अभ्यासाची एक पध्दत आहे. आजची वाचने एकूण तीन परस्परविरोधी गोष्टी एकत्र गुंफताना आढळतात. त्याद्वारे प्रभू येशूचे जीवन, कार्य आणि संदेश प्रकट करण्यात आलेला आहे :

**अ) युध्द आणि शांती :** प्राचीन इस्राएलमध्ये घोडा हे युध्दाचे तर गाढव हे शांतीचे प्रतीक मानले जाई. आजच्या पहिल्या वाचनात (जखऱ्या ९:९-११) मसीहा हा घोड्यावर नव्हे तर गाढवावर आरूढ होऊन येईल असे भाकीत करण्यात आलेले आहे. पुढे ते येशूच्या जेरूसलेम प्रवेशामध्ये पूर्णत्वास गेले. त्यात येशू हा शांतीचा राजपुत्र असेल हे भविष्य दडलेले होते.

**ब) देहस्वभाव आणि आत्म्याची प्रेरणा :** आजच्या दुसऱ्या वाचनात (रोम.८:९,११-१३) संत पौल देहस्वभाव आणि आत्म्याची प्रेरणा ह्यांच्यातील भेद स्पष्ट करतो. देहस्वभावाने मानवाचा विनाश होत असल्याने ख्रिस्ताने हा देहस्वभाव क्रूसावर खिळलेला आहे तर आत्म्याच्या प्रेरणेने जीवन जगल्यास मानवाला सार्वकालिक जीवनाचा लाभ होईल अशी शाश्‍वती संत पौल आपल्याला देतो. हे सार्वकालिक जीवन सर्वांना लाभावे म्हणून प्रभू येशू जगात अवतरला.

**क) जड ओझे आणि सोयीचे जूं :** आजच्या शुभवर्तमानात (मत्तय ११:२५-३०) कष्टी आणि भाराक्रांत जनांना येशू विसावा घेण्यासाठी आपणाकडे बोलावतो. त्यांच्या अवजड ओझ्यांपेक्षा येशूचे जूं सोयीचे आहे कारण एका बाजूला येशूने ते आपल्या खांद्यावर घेतलेले आहे व दुसऱ्या बाजूला खांदा देण्यासाठी तो आपल्याला बोलावीत आहे. असे जूं स्वीकारण्यासाठी आपण लीन व सौम्य मनाचे असणे गरजेचे आहे.

**आत्मपरीक्षण :** वरीलपैकी कोणकोणत्या परस्परविरोधी गोष्टी माझ्या जीवनात आंतरिक संघर्षाची भावना उत्पन्न करतात? येशूचे जूं मी खांद्यावर घेण्यास कितपत तयार आहे?

●●●

| जुलै २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | दुसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम १० | सं फेलिसिटी आणि तिची सात रक्ताक्षी मुले (हि) | : उत्पत्ती २८:१०-२२/मत्तय ९:१८-२६ |
| मंगळ ११ | सं बेनेदिक्त (पां) | : उत्पत्ती ३२:२२-३२/मत्तय ९:३२-३८ |
| बुध १२ | सं जॉन गोल्बर्ट (हि) | : उत्पत्ती ४१:५५-५७, ४२:५-७, १७-२४/मत्तय १०:१-७ |
| गुरू १३ | सं हेन्री दुसरे (हि) | : उत्पत्ती ४४:१८-२१, २३-२९, ४५:१-५/मत्तय १०:७-१५ |
| शुक्र १४ | लेलीसचा सं कॅमिलुस (हि) | : उत्पत्ती ४६:१-७, २८-३०/मत्तय १०:१६-२३ |
| शनि १५ | सं बोनावेंचर (पां) | : उत्पत्ती ४९:२९-३३, ५०:१५-२५/मत्तय १०:२४-२३ |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटॅकेटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**

चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)